**अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ९७/२०२५**
**निशाणी क्र. २७**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. वडकी** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
**प्रकाश नथ्थुजी देहारकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. २** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | बिपीन चंद्रमणी वनकर |
| वय अंदाजे ३५ वर्षे | धंदा– नौकरी, तंत्रज्ञ म.रा.वि.वि.क.म. |
| राहणार | यवतमाळ, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

दिनांक १७/११/२०२३ रोजी पोलीस आमच्या म.रा.वि.वि.कं.म. च्या कार्यालयात आले व पोलीस मला पिंप्रि येथे घेवून गेले. घटनास्थळावर एक केबल पडलेले होते व तो केबल आम्ही पोलीसांच्या गाडीत टाकला.

**साक्षीदार त्यांच्या बयानाप्रमाणे पुरावा देत नसल्यामुळे त्याची उलटतपासणी घेण्याची परवानगी सरकारी वकिलांनी मागीतली. त्यानूसार परवानगी देण्यात आली.**

**उलटतपासणी सरकारतर्फे श्री यु. के. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत सुरुः–**

२. गिरी साहेबांना मारहाण जिथे झाली ती जागा दाखवण्यासाठी पोलीसांनी मला म्हटले व मी त्यानूसार पोलीसांसोबत गेलो. विज चोरीच्या प्रकरणाबाबत श्री गिरी यांना मारहाण करण्यात आली होती. त्यांना मारहाण कोणी केली होती, हे मला नंतर समजले. आरोपीने श्री गिरी यांना मारहाण केल्याचे मला नंतर समजले. आता मला न्यायालयामध्ये केबल दाखवण्यात आला, तो केबल तोच असल्याचे मला आता सांगता येणार नाही.

३. माझे शिक्षण आय.टी.आय. तसेच पॉलीटेकनीक, बि.ए. व बि.कॉम. असे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की मला मराठी व इंग्रजी लिहिता वाचता येते. सध्या मी म.रा.वि.वि.कं.म.मध्ये तंत्रज्ञ म्हणून काम करीत आहे. मी नविन विद्युत मिटर बसवून देण्याचे व मिटर बदलवून देण्याचे काम करतो, तसेच विज उपकरणे दुरुस्ती करण्याचे काम करतो.

मला कागदपत्रे वाचावी लागतात. असे होत नाही की माझ्यासमोर एखादा कागद ठेवल्यावर मी त्यावर न वाचता सही करतो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला, त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक २८ वर आहे**. सूचना पत्र आता मला दाखवले, त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपीला वाचविण्याकरीता मी सांगीतले की माझ्यासमोर पंचनामा तयार करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की पंचनामा माझ्यासमोर पोलीसांनी तयार केला.

**उलट तपासणी आरोपीचे वकील श्री. आर. डी. सोनटक्के यांचे मार्फत सुरु –**

४. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी मला कोणतेही पत्र दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्यासमोर चतुःसिमा घेण्यात आल्या होत्या. साक्षीदार स्वतः सांगतात की त्यानंतर पंचनामा तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी अगोदरच पंचनामा तयार केला होता. हे म्हणणे खरे आहे की पंचनाम्यामध्ये पोलीसांनी काय लिहिले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की देहारकर चे नाव मला आज माहित पडले. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी–काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

दिनांक – २०/०१/२०२६